**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २६ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **यूपीएससीसी च्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विधानपरिषदेत पुनरुच्चार.**
2. **नागपुरात वेव्हज ॲनिमे आणि मंगा स्पर्धाचे यशस्वी आयोजन, लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद.**
3. **महाराष्ट्रात तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारने घेतला मागे.**
4. **शासकीय दाखल्यांसाठी महसूल विभागाचे महाअभियान - महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधिमंडळात निवेदन.**

-------------------------------------

**यूपीएससीसीच्या धर्तीवर एमपीएससी**

**यूपीएससीसीच्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. हा निर्णय २०२२ मध्येच झाला होता, मात्र लगेच अंमलबजावणी करू नये अशी मागणी झाल्यानं याच्या अंमलबजावणीला २०२५ पर्यंत मुदत दिली होती.असं ते म्हणाले**

***यूपीएससी मध्ये डिस्क्रिप्टिव आहे आणि एमपीएससीची तयारी करणारे आपले मुलं डिस्क्रिप्टिव तयारी करत नाही. त्यामुळे यूपीएससी अपिअर होऊ शकत नाही त्यामुळे म्हणून आपण जाणीवपूर्वक निर्णय घेतला. हा निर्णय 2022 साली घेतला. तथापि ज्या वेळेस 2022 च्या शेवटी मला सगळी मुलं येऊन भेटले आणि त्यांनी सांगितलं, तुम्ही अचानक असा निर्णय केला तो वीस पासून आपण म्हणतो आहे आमच्यावर अन्याय होईल त्याच वेळेस आपण घोषणा केली होती की आम्ही हा डेफर करतो, 2025 पासून लागू करू.***

**काही मूठभर शिकवणी वर्ग याविरोधात परीक्षार्थींना उकसवत आहेत, मात्र ही परीक्षा पद्धती विद्यार्थ्यांच्या हिताची आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. भाजपाचे प्रवीण दरेकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. सरकारच्या विभागांनी आकृतीबंध तयार करून मागणी केल्यानंतर एमपीएससीकडून परीक्षा घेण्यात येते, असं सांगत दिरंगाई करून कोणत्याही परीक्षार्थींवर सरकार अन्याय**

करणार नाही असं मंत्री आशिष शेलार यांनी या प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. पूर्व परीक्षेसाठी देण्यात आलेले ईडब्लूएस आणि एसईबीसीचे पर्याय मुख्य परीक्षेसाठी हे पर्याय लिंकवर उपलब्ध करून देण्यात येतील तसंच यांना एनसीसी प्रमाणपत्र देखील मुलाखतीच्या वेळी ग्राह्य धरलं जाईल असं शेलार यांनी सांगितलं.

-------------------------------------

१७ करारांना मंजुरी

स्वित्झर्लंडमधल्या दावोस मध्ये यावर्षी झालेल्या जागतिक आर्थिक मंच परिषदेत झालेल्या ५१ सामंजस्य करारांपैकी १७ करारांना मंजुरी मिळाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. याअंतर्गत तीन लाख ९२ हजार ५६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला कालच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता दिल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात सांगितलं. यामुळे राज्यात एक लाख ११ हजार ७२५ प्रत्यक्ष आणि अडीच ते तीन लाख प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

-------------------------------------

अण्णा बनसोडे

विधानसभा उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे अण्णा बनसोडे यांची निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात मांडलेल्या प्रस्तावाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अनुमोदन दिलं. त्यानंतर आवाजी मतदानाने अण्णा बनसोडे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही घोषणा केली. त्यानंतर सभागृहाच्या वतीने बनसोडे यांचं अभिनंदन करण्यात आलं.

-------------------------------------

वेव्हज

भारतीय माध्यम आणि मनोरंजन संघटनेने माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सहकार्याने काल नागपूरच्या जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयात वॅम! अर्थात वेव्हज ॲनिमे आणि मंगा स्पर्धा चे आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात नागपूर आणि परिसरातील प्रतिभावंत कलाकार, ॲनिमेटर आणि आशय निर्माते सहभागी झाले होते. या स्पर्धकांनी कॉस्प्ले स्पर्धेसह मंगा, वेबटून आणि ॲनिमे श्रेणींमध्ये आपले कौशल्य दाखवले. या स्पर्धाच परीक्षण उद्योग क्षेत्रातील मान्यवरांच्या पॅनेलद्वारे केले गेले ज्यामध्ये भसीन

समूहाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक आणि मीडिया अँड एंटरटेनमेंट असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सुशील भसीन यांचा समावेश होता.यावेळी कॉस्प्ले मध्ये महेश शौकत सय्यद, मंगा मध्ये अनिशा बांगरे, वेबटून मध्ये अंजली वर्मा आणि ॲनिमे मध्ये एन्टँगल्ड स्टुडिओ प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले. सदर विजेत्यांना पेन टॅब्लेट, स्टेशनरी तसेच रोख बक्षिसे देण्यात आली.

---------------------------------------

प्रधान महालेखापाल

नागपूरच्या प्रधान महालेखापाल कार्यालयात उद्या सकाळी 11 वाजता विविध ई-प्रकल्पांच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रधान महालेखपाल यांच्या हस्ते हे उदघाटन कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात पार पडेल. या इ प्रकल्पांमुळे महाराष्ट्र राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होतील असं निवृत्ती वेतन विभागाचे वरिष्ठ उपमहालेखापाल भूषण यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे कळवले आहे.

---------------------------------------

इलेक्ट्रिक वाहनांवर कर

तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारने घेतला होता, मात्र मंत्रिमंडळात यावर चर्चा होऊन असा कर लावण्याची गरज नाही असा निर्णय झाला. त्यामुळे हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाचे उत्तर देताना सांगितलं. सर्व सरकारी वाहनं तसंच मंत्र्यांची वाहनं टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक करण्यात येतील असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आमदारांना यापुढे फक्त इलेक्ट्रिक वाहनांसाठीच कर्ज दिलं जाईल असंही त्यांनी सांगितलं. आंबिवली इथल्या इराणी वस्तीत पोलिसांवर हल्ले झाल्या प्रकरणी कोम्बिंग ऑपरेशन राबवलं जाईल, तसंच मोकका लावला जाईल असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितलं. या परिसरात अनधिकृत बांधकामे असतील तर कारवाई केली जाईल असंही त्यांनी सांगितलं. प्रवीण दरेकर, अनिल परब यांनी हा प्रश्न विचारला होता.

---------------------------------------

महाअभियान'

राज्यात महसूल विभागाशी संबंधित सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज

महाराजस्व समाधान शिबिर महाअभियान' हाती घेण्यात आले आहे. हे अभियान सर्वसामान्यांसाठी वरदान ठरणार असल्याचा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात व्यक्त केला. प्रत्येक महसूली मंडळात वर्षातून चार वेळा हे शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक शिबिरासाठी २५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार असून, वर्षाला किमान १६०० शिबिरे घेतली जातील अशी माहिती बावनकुळे यांनी दिली. राज्यातील रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, जातीय प्रमाणपत्र, रेशन कार्ड वाटप, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवणे यासाठी लोकांना सरकारी कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागतात. मात्र, अभियानामुळे महसूल विभागाशी संबंधित सर्व तक्रारी आणि अर्ज एका ठिकाणी हाताळले जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांना महिनोंमहिने सरकारी दारात फिरावे लागणार नाही.

---------------------------------------

भीषण आग

नागपूर - भंडारा मार्गावरील बिडगाव नाक्यावर दोन गोदामांना काल रात्री भीषण आग लागली. या आगीत गोदामातील प्लास्टिक पिशव्या आणि इतर साहित्य जळून खाक झालं. अग्निशमन दलाच्या पाच पथकांनी आग आटोक्यात आणल्याचं आमच्या वारताहराने कळवलं आहे.

---------------------------------------

हवामान

विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 41.4 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर अमरावती आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये देखील तापमान 40°c च्या पुढे होतं नागपुरात आज 38.4 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. आगामी 30 तारखेपर्यंत सर्वत्र हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

---------------------------------------

क्षयरुग्ण दत्तक

श्री भवानी हॉस्पीटल, पारडी आणि असोसिएशन ऑफ चॅरीटेबल हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्‌यमाने २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिवस श्री भवानी रुग्णालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात नागपूर महानगरपालिकेच्या वतीने वैद्‌यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी क्षयरुग्णांच्या सहकार्यासाठी समाजातील सेवाभावी संस्थांनी पुढे येण्याचे आवाहन

केले. त्याला प्रतिसाद देत श्री भवानी हॉस्पीटल संस्थेने ५० क्षयरुग्णांना दत्तक घेण्याचा संकल्प केला.

------------------------------------

फेरपरीक्षा

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी-2024 एम.ए.संस्कृत सेमि.-1 व्याकरण भाषाविज्ञान या विषयाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा केंद्र क्र.103 वरील फेरपरीक्षा विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार त्याच केंद्रावर 3 एप्रिलरोजी दुपारी 2 ते 5 या वेळेत घेण्यात येणार आहे.

------------------------------------

ग.त्र्यं.माडखोलकर स्मृती व्याख्यान

विदर्भ साहित्य संघातर्फे ग.त्र्यं.माडखोलकर स्मृती व्याख्यान पुष्प गुरुवार, २७ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता विदर्भ साहित्य संघाचे अमेय दालन, चौथा माळा, सांस्कृतिक संकुल, सीताबर्डी येथे आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा विषय गालिब आणि त्याची गझल असा असून, प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ.अक्षयकुमार काळे हे व्याख्यानपुष्प गुंफणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते असतील. यात सहभागी होण्याचे आवाहन विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने केले आहे.

------------------------------------